मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 20 एप्रिल 2025 | पान- 1

# मांजरेवाडीकरांच्या 'अपेक्षे'ला न्याय द्या!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भाजपाचे आमदार महेश लांडगे यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील मौजे मांजरेवाडी (धर्म) येथील महाविद्यालयीन युवतीवर अत्याचार करून तिची अमानुषपणे हत्या झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमधील आरोपी अटक आहे. मात्र, पालक तसेच परिसरातील नागरिक प्रचंड भयभीत आहेत. या घटनेतील आरोपीचा खटला तात्काळ 'फास्टट्रॅक कोर्टात' चालविण्यात यावा. सदर गुन्ह्यातील आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले आहे. महिला भगिनींवर वाकडी नजर ठेवत त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यांमध्ये जरब बसावी यासाठी, अशी शिक्षा गरजेची आहे असेदेखील आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.



दरम्यान, पीडित कुटुंबीयांची आमदार लांडगे यांनी सांत्वनपर भेट घेतली. मांजरे कुटुंबीयांवरती दुःखाचा डोंगर कोसळला आहे. ग्रामस्थांच्या भावना जाणून घेतल्या. अत्याचारात मृत्युमुखी पडलेल्या मुलीबाबत शोक व्यक्त केला.

मौजे मांजरेवाडी (धर्म) येथील शेतकरी कुटुंबातील 17 वर्षीय विद्यार्थिनी राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर त्यांच्याच गावातील नराधम आरोपी नवनाथ कैलास मांजरे याने अमानुष अत्याचार करून तिचा निर्घृण खून केला. पुरावा नष्ट करत तिचा मृतदेह नदीपर्यंत ओढीत नेऊन भीमा नदीत टाकला होता.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, शेतकरी कुटुंबातील ही विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेत होती. याशिवाय ती उत्कृष्ट कबड्डीपटू उद्यान्मुख खेळाडू होती. अनेक कष्ट करत संबंधित विद्यार्थिनीचे पालक तिला उच्चशिक्षित करण्याचे स्वप्न पाहत होते. मात्र समाजातील एका विकृतीमुळे हे स्वप्न पूर्णत्वाला जाऊ शकले नाही. त्यामुळे अशा घटनांमध्ये तातडीने कारवाई होणे अपेक्षित आहे. राजगुरुनगरमधील ही घटना माणुसकीला, नातेसंबंधांना काळीमा फासणारी आहे. त्यामुळे या घटनेतील आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा व्हावी. यासाठी हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

> “ माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी समाजातील विकृत प्रवृत्तींवर जरब बसविणे गरजेचे झाले आहे. राजगुरुनगरमधील घटनेमध्ये ही आपल्यामध्येच वावरणाऱ्या एका विकृतीमुळे उदयोन्मुख तरुणीचा अंत झाला. ही घटना मनाला हेलावून टाकणारी आहे. माता-भगिनींच्या सुरक्षेसाठी कडक कायदे सरकारने केलेले आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी. सदर खटला 'फास्टट्रॅक कोर्ट'मध्ये चालवून आरोपीला फाशीच व्हावी, अशी मागणी आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

---

# पिंपरी चिंचवड शहरात दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा!

## चिखली मोशी पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे आयुक्तांना पत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या पिंपरी चिंचवड शहरात अतिशय दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. याबाबत तातडीने महापालिका आरोग्य, पाणीपुरवठा विभागाने लक्ष द्यावे. दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाण्यामुळे परिसरात जलजन्य आजारांचे प्रमाण वाढू नये याची काळजी घ्यावी अशी नागरिकांची मागणी आहे.

चिखली मोशी पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने अशुद्ध, दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असलेल्या तक्रारींबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे लक्ष वेधले आहे. याबाबत फेडरेशनच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, महानगरपालिकेच्या सर्व भागात पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा अतिशय अशुद्ध आणि घाण स्वरूपाचा आहे. या पाण्याला उग्र स्वरूपाचा वास येत आहे. हे पाणी पिण्यासाठी योग्य



वाटत नाही. या घाण आणि अशुद्ध पाण्यामुळे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणात जलजन्य आजार पसरण्याची शक्यता आहे.

पाणीपुरवठा विभागाला योग्य त्या सूचना देऊन शुद्ध पाणीपुरवठा नागरिकांना करावा . नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. पुढील चार दिवसांमध्ये या दूषित होणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा झाली नाही तर फेडरेशन मार्फत लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

> “ मागील पंधरा दिवसांमध्ये पिंपरी चिंचवड शहरात अतिशय घाण स्वरूपाचा आणि उग्र असा वास येणारा पिवळसर रंगाचा पाणीपुरवठा महानगरपालिकेकडून केला जात आहे. महानगरपालिकेच्या आयुक्तांचे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागावर नियंत्रण दिसत नाही. अशुद्ध पाणीपुरवठ्यामुळे लहान मुले, गरोदर महिला, आणि वयोवृद्ध नागरिक यांना पाण्याचा खूप त्रास होत आहे. पाणीपुरवठा शुद्ध स्वरूपाचा झाला नाही तर फेडरेशन मार्फत लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात करून हेच आलेले घाण आणि अशुद्ध पाणी महानगरपालिकेच्या आयुक्तांना पिण्यासाठी दिले जाईल.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली -मोशी - पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# पुरंदर विमानतळासाठी 10 दिवसांत ड्रोन सर्वेक्षण

## शेतकऱ्यांना देण्यात येणार पूर्वसूचना : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनासाठी करण्यात येणाऱ्या संयुक्त मोजणीसाठी ९ एप्रिलपासून अत्याधुनिक तंत्र म्हणून ड्रोनचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली होती. मात्र, हे सर्वेक्षण आता पुढील १० दिवसांत करण्यात येईल, असे स्पष्टीकरण डुडी यांनी आता दिले आहे. याबाबत संबंधित सातही गावांतील शेतकऱ्यांना पूर्वसूचना देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. मोजणी आणि ड्रोन सर्वेक्षण हे एकाच वेळी होणार आहे.



विमानतळासाठी पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव या सात गावांमध्ये विमानतळ होणारच अशी स्पष्ट भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीरपणे घेतली आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून भूसंपादनापूर्वीची प्रक्रिया सुरू आहे. यापूर्वी जिल्हा प्रशासनाने सातही गावांतील शेतकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी संवाद सभांचे आयोजन केले होते. सुरुवातीला दोन गावांत चर्चा झाली. त्यानंतर सर्व गावांतील ग्रामस्थांनी सासवड येथे उपोषण केले. प्रांताधिकारी वर्षा लांडगे यांनी त्यात यशस्वी मध्यस्थी केल्यानंतर ते मागे घेण्यात आले. मात्र, त्यानंतर झालेल्या संवाद सभांकडे ग्रामस्थांनी पाठ फिरविली.

या सातही गावांतील जमिनीची मोजणी करण्यासाठी ड्रोन सर्वेक्षण करण्याचा प्रशासनाचा विचार आहे. बागायत, जिरायत जमिनींचे नेमके क्षेत्र, त्यातील झाडांची तसेच विहिरींची संख्या, घरांची संख्या यांचा तपशील ड्रोन सर्व्हेतून संकलित केला जाणार आहे. तत्पूर्वी एमआयडीसीने संयुक्त मोजणीसाठी चार कोटी ८६ लाख रुपयांचे शुल्क भूमिअभिलेख विभागाकडे जमा केले आहे. लवकरच या मोजणीसाठी संबंधित शेतकऱ्यांना नोटिसा जारी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, पारगाव गावात बुधवारी रात्री चार-पाच ड्रोनने घिरट्या घालण्यास सुरुवात केल्याचे काही तरुणांनी पाहिले होते. आम्हाला जमीन द्यायची नाही, असे म्हणत एका शेतकऱ्याचा गुरुवारी मृत्यू झाला. त्याबाबत प्रशासनाकडून त्या व्यक्तीच्या मृत्यूचा दुजोरा देण्यात आला आहे. मात्र, ड्रोनमुळे मृत्यू झाला नसल्याचे सांगण्यात आले.

याबाबत डुडी म्हणाले, पुरंदर तालुक्यात विमानतळ करण्यासाठी सरकारने प्रशासनाला आदेश दिले आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. अद्याप सात गावांमध्ये कोठेही सरकारच्या वतीने ड्रोन फिरला नाही अथवा फिरविण्यात आला नाही. येत्या दहा दिवसांत ड्रोनद्वारे सर्व्हे केला जाईल. त्याच वेळी मोजणीही केली जाणार आहे. मोजणी आणि ड्रोन सर्व्हे करण्यापूर्वी स्थानिक शेतकऱ्यांना प्रशासनाकडून माहिती देण्यात येईल. ड्रोन सर्व्हे हा दिवसा करण्यात येतो. तो रात्री करण्यात येत नाही. दिवसा सर्व्हे केल्यानंतर जमिनीत काय आहे, कशा प्रकारची जमीन आहे, हे कळू शकेल. यासंदर्भात अद्याप कोणतेही आदेश प्राप्त झाले नाहीत, असे प्रशासनातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# उजनीचा पाणीसाठा उणे - 0.03 टीएमसी

## पुण्यासह अहिल्यानगर, सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी म्हणून उजनी धरणाची ओळख

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेलं उजनी धरण शुक्रवारी (दि.१८) सकाळी सहा वाजता मायनसमध्ये गेले आहे. उजनी धरणात आता उपयुक्त पाणीसाठा उणे -०.०३ टीएमसी तर मृत पाणीसाठा ६३.६२ टीएमसी एवढा आहे. सध्या उजनी धरणामधून भीमा नदी तसेच मुख्य कालवा आणि इतर पाणी योजनांद्वारे सहा हजार क्युसेक असा विसर्ग सुरू आहे त्यामुळे उजनीची पाणी पातळी झपाट्याने कमी होत आहे.



पुण्यासह अहिल्यानगर, सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी म्हणून उजनी धरणाची ओळख आहे. गतवर्षी पाऊस चांगला झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने म्हणजे ११० टक्के भरले होते. धरणाची पाणी साठवण क्षमता १२३ टीएमसी असून यापैकी ६३ टीएमसी पाणीसाठा मृतसाठा असतो. तर ५४ टीएमसी पाणी उपयुक्त साठ्यात असते. सध्या उजनी धरणात एकूण पाणी साठवण क्षमतेच्या ६३.६२ टीएमसी इतकाच पाणीसाठा आहे.

उजनी धरणातील पाणीसाठा कमी झाल्यामुळे धरण क्षेत्रात ठिकठिकाणी छोटी-मोठी बेटे उघडी पडली आहेत. उजनी धरणावर अवलंबून असलेल्या पाणी योजना, सिंचन योजना व औद्योगिकीकरणास पाणी पुरवठ्याचे नियोजन होणे गरजेचे आहे; मात्र दरवर्षी धरणातील मृतसाठ्यातील निम्म्याहून अधिक पाणीसाठा संपेपर्यंत पाणी वापरले जाते. दरम्यान, पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीसाठी पहिल्या आवर्तनानंतर दुसरे आवर्तन त्याचबरोबर आषाढी वारीसाठी धरणातून पाणी सोडण्याचे नियोजन असल्याचे समजते.

उजनी धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत असल्याने याचा फटका शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून आणखी दोन ते अडीच महिने राहण्याची शक्यता आहे.

**उजनी धरणाची शुक्रवारी सकाळी सहा वाजताची स्थिती:**

- एकूण पाणीपातळी ४८०१.८३ दशलक्ष घनमीटर
- उपयुक्त पाणीपातळी ०.९८ दशलक्ष घनमीटर
- एकूण पाणीसाठा ६३.६२ टीएमसी
- उपयुक्त पाणीसाठा ०.०३ टीएमसी
- धरणात उपयुक्त पाणी साठा ०.०६ टक्के

# अडीच लाखांहून अधिक बालकांना मेंदूज्वर प्रतिबंधक लस

## पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने राबवलेल्या जपानी मेंदूज्वर प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने राबवलेल्या जपानी मेंदूज्वर प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या दीड महिन्यात अडीच लाखांहून अधिक मुलांचे लसीकरण यशस्वीरीत्या पार पडले आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने राबवलेल्या जपानी मेंदूज्वर प्रतिबंधक लसीकरण मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, अवघ्या दीड महिन्यात अडीच लाखांहून अधिक मुलांचे लसीकरण यशस्वीरीत्या पार पडले आहे. १ मार्च २०२५ पासून सुरू झालेल्या या मोहिमेंतर्गत शहरातील १ ते १५ वयोगटातील बालकांना ही लस मोफत दिली जात आहे.

शाळा, अंगणवाड्या, प्राथमिक आरोग्य केंद्रे, तसेच विशेष लसीकरण शिबिरांमध्ये ही मोहीम मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत असून, लसीकरण केंद्रांवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. पालकांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला आहे. ही लस राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांतर्गत दिली जात असून, पूर्णतः सुरक्षित आहे, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

१५ एप्रिल २०२५ पर्यंत झालेल्या लसीकरणानुसार एकूण २ लाख ५९ हजारांहून अधिक मुलांना जपानी मेंदूज्वर प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. महापालिकेच्या विविध रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर लसीकरण झाले असून, आकुर्डी रुग्णालयात ४०,५२१, भोसरीत ४९,९५१, जिजामाता रुग्णालयात ३४,७५५, सांगवीत २४,७८६, तालेरात ३२,३४९, थेरगावात २०,०६४, यमुनानगरमध्ये ४६,७९३ आणि वायसीएम रुग्णालयात १०,२९५ बालकांचे लसीकरण करण्यात आले.

महापालिकेच्या आरोग्य यंत्रणेने ही मोहीम अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने राबवली असून, शाळा आणि स्थानिक केंद्रांमधून एकाच वेळी लसीकरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली आहे. या मोहिमेमुळे भविष्यात शहरातील बालकांमध्ये जपानी मेंदूज्वराचे प्रमाण कमी होण्याची शक्यता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. सध्या ही मोहीम अजून काही दिवस सुरू राहणार असून, अद्याप लसीकरण न झालेल्या बालकांचे लसीकरण करण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.



> जपानी मेंदूज्वर हा विषाणूजन्य आजार असून, तो प्रामुख्याने १५ वर्षांखालील मुलांमध्ये आढळतो. हा आजार मेंदूच्या मज्जातंतूंवर गंभीर परिणाम करू शकतो. देशातील सार्वजनिक आरोग्य समस्यांपैकी एक म्हणून याकडे पाहिले जाते. कारण, यामध्ये मृत्यूदर सुमारे ३० टक्के आहे. तसेच, ३०-४० टक्के बरे झालेल्या रुग्णांमध्ये आजीवन मज्जासंस्थेशी संबंधित अपंगत्व दिसून येते. त्यामुळे या जीवघेण्या आजारावरील प्रतिबंधात्मक लसीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. पालकांनी आपल्या मुलांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी या लसीकरण मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा व मुलांना जपानी मेंदूज्वर प्रतिबंधक लस द्यावी.
>
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

> जपानी मेंदूज्वर हा एक गंभीर आजार असून, ताप, सतत उलट्या होणे अशी लक्षणे दिसू शकतात. काही प्रकरणांमध्ये मृत्यूही होऊ शकतो. त्यामुळे या आजारावरील लसीकरण हा एकमात्र सुरक्षित पर्याय आहे. पालकांनी आपल्या मुलांचे लसीकरण करून घ्यावे.
>
> **- डॉ. लक्ष्मण गोफणे, मुख्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# देहूफाटा ते देहूगाव रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

## तळेगाव-चाकण महामार्गाला जोडणारा तीर्थक्षेत्र देहू ते देहू फाटा दरम्यानचा रस्ता ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे धोकादायक बनला आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळेगाव-चाकण महामार्गाला जोडणारा तीर्थक्षेत्र देहू ते देहू फाटा दरम्यानचा रस्ता ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे धोकादायक बनला आहे. सदर खड्डेमय मार्गावर वारंवार अपघात घडत असून भाविकांसह सर्वसामान्य नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा नादुरुस्त रस्ता रुंदीकरणासह दर्जेदार कामाच्या प्रतीक्षेत आहे.

तीर्थक्षेत्र देहू ते देहू फाटा हा जवळपास ३ किमीचा रस्ता मावळ, खेड आणि हवेली तालुक्याला जोडणारा मुख्य रस्ता आहे. या परिसरातील भंडारा डोंगर, सुदुंबरे गावाजवळील भामचंद्र डोंगर, संत तुकाराम महाराजांची कन्या भागिरथी मातेचे सासर तीर्थक्षेत्र येलवाडी आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची जन्म, कर्म, ज्ञान भूमी असणारे तीर्थक्षेत्र देहूगाव ही ठिकाणे भाविक वारकऱ्यांसाठी पवित्र आहेत. त्यामुळे या मार्गावर भाविकांची सतत वर्दळ असते.

यासह तळेगाव, चाकण, तळवडे भागात औद्योगीकरण असल्याने ह्या रस्त्यावर अवजड वाहनांची मोठी वर्दळ असते. तीर्थक्षेत्र देहूमध्ये वर्षातून तीन वेळा मोठ्या यात्रा भरतात, तर प्रतिदिन हजाराहून अधिक भाविक दर्शनासाठी येत असतात. दर्शनार्थ येणाऱ्या वारकरी भाविकांनाही याच मार्गावरून ये-जा करावे लागत असते, अशावेळी हा नादुरुस्त रस्ता सर्वांसाठीच धोकादायक ठरत आहे.

देहूफाटा ते देहूगाव रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे गतिरोधक असून हे गतिरोधक नियमानुसार नसल्याचे दिसतात. गरजेपेक्षा अधिक उंच व पांढरे पट्टे नसल्याने हे गतिरोधक देखील जीवघेणे ठरत आहेत. त्यामुळे अवजड वाहने येथून जात असताना सकाळ-सायंकाळ मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते.

देहू फाटा ते देहूगाव दरम्यान किमान शंभर फुटी रस्त्याचे रुंदीकरण व्हावे, रस्त्याच्या दुतर्फा किमान चार फुटांचा पदपाथ असावा, पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारलाइन व्हावी, मध्यभागी डिव्हाइडर असावेत, रस्त्यालगत विद्युत पथदिवे असावेत, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.



### कार्यक्रमावेळी तात्पुरती डागडुजी

» काही दिवसांपूर्वी बीज सोहळ्यासाठी आलेले उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील याच मार्गाने भंडारा डोंगरावर गेले होते. मात्र तेव्हा तात्पुरती डागडूजी करण्यात आलेली, त्यामुळे पंधरा दिवसांत रस्त्याची अवस्था पुन्हा बिकट झाली आहे. सदर रस्त्यासाठी पीएमआरडीने ८१ कोटी रुपयांच्या प्रस्तावित निधीच्या निविदाही मागवल्या होत्या. परंतु तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने चारही निविदा रद्द झाल्याची माहिती मिळत आहे. यासंदर्भात पीएमआरडीचे अभियंता बगाडी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### भूसंपादन होऊनही रुंदीकरण नाही

» आठ वर्षांपूर्वी रस्त्याच्या रुंदीकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया झाल्याची आणि अनेक बाधित शेतकऱ्यांनी रकमाही घेतल्याची माहिती येलवाडीचे माजी सरपंच नितीन गाडे यांनी दिली. परंतु, रस्ता रुंदीकरण आणि नूतनीकरणासाठी तळेगाव-चाकण-महामार्ग कृती समिती, येलवाडी ग्रामस्थ आणि भाविकांनी वारंवार आंदोलने करूनही तात्पुरती डागडुजी वगळता रस्त्याचे काम कधीही चांगले झाले नसल्याचे त्यांनी सांगितले.

# लोकांना संघटित करून उत्तम संस्कार देण्यासाठी वारकऱ्यांचे योगदान

## वारकरी संत पीठ भूमिपूजन व लोकनेते दादा जाधवराव माध्यमिक विद्यालय रौप्य महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

**पुणे | प्रतिनिधी**

देशाचा अनेक वर्षांचा इतिहास हा बघितल्यानंतर लोकांना संघटित करण्यासाठी आणि त्यांच्यावर उत्तम संस्कार देण्यासाठी अनेक वर्ष काही घटकांनी प्रचंड कामगिरी केली. ती मालिका बघितली तर वारकऱ्यांशिवाय ही मालिका कधी पूर्ण होऊ शकत नाही. असे प्रतिपादन केंद्रीय माजी कृषी मंत्री शरद पवार यांनी केले.

अभिनव मित्र मंडळ शिंदेवाडी संस्था व वारकरी संतपीठ फाऊंडेशन आयोजित वारकरी संत पीठ भूमिपूजन व लोकनेते दादा जाधवराव माध्यमिक विद्यालय रौप्य महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शरद पवार उपस्थित होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार बापूसाहेब पठारे, जगन्नाथराव शेवाळे, ॲड. अशोक पवार व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पवार पुढे म्हणाले की,आज आपण बघतो, पंढरीची वारी असो किंवा आणखी काही कार्यक्रम असो कशाचाही विचार न करता त्यामध्ये सहभागी झालेले लाखो लोक आपल्याला बघायला मिळतात. उन्हातानाचा विचार करत नाहीत, दगड धोंड्यांचा विचार करत नाहीत. मनामध्ये संतांचा विचार ठेवून त्याचा प्रचार करण्यासाठी आवश्यकता ही गोष्ट ध्यानात ठेवून आज पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी त्या ठिकाणी जात असतात.

या कार्यक्रमाचं वैशिष्ट्य हे आहे की, माध्यमिक विद्यालयाचा रौप्य महोत्सव आणि संतांचा विचार हा जनमानसांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक व्यासपीठ असावं, त्याची उभारणी करण्यासंबंधीचा विचार आजच्या या कार्यक्रमामध्ये आहे. त्यामध्ये ज्यांनी पुढाकार घेतला ते विकास लवांडे आणि त्यांचे सगळे सहकारी या सगळ्यांचे याठिकाणी मी मनापासून स्वागत करतो.

त्याचा पाया हा शास्त्रशुद्ध व्हावा, संतांचा विचार हा प्रस्तुत करण्यासाठी योग्य असा अभ्यासक्रम असावा, गुरुकुल पद्धतीचा स्वीकार व्हावा. असे काही उद्देश विकास लवांडे यांनी पुढे ठेवले. समाधानाची गोष्ट अशी आहे की, या सगळ्या विचारांना, उद्देशांना आशीर्वाद देण्यासाठी दिनकर शास्त्री भुकेले , राजाभाऊ चोपदार , भारत घोगरे महाराज असोत, बापूसाहेब महाराज मोरे, ज्ञानेश्वर महाराज जळगावकर ही सगळी या क्षेत्रातील कशाचाही यत्किंचित स्वार्थी विचार न ठेवता एक स्वच्छ पद्धतीने जीवन जगणारे आणि संतांच्या विचारांची जनमानसांमध्ये पेरणी करणारे अशी ही मंडळी या आशीर्वादासाठी या ठिकाणी आहेत. त्या सगळ्यांचे आशीर्वाद, मार्गदर्शन श्री. लवांडे यांना मिळेल याची मला खात्री आहे. त्यामुळे या अपेक्षा आहेत की एक अतिशय चांगलं अशा प्रकारचं पीठ या ठिकाणी उभं करावं, त्याची पूर्तता होईल अशी अपेक्षा करू.





### ....त्या आठवणीला उजाळा

» पवार साहेबांनी सांगितले की बऱ्याच वर्षांनी मी या भागात आलो. मला आठवलं आता मी मगापासून बघत होतो समोर मला ते कोतवाल दिसले. कोतवाल आष्टापूरचे सरपंच होते. आष्टापूरच्या पुलाच्या कामासाठी बहुतेक ९२-९३ साली कधीतरी मी त्या ठिकाणी आलेलो होतो. त्यावेळी ते कोतवाल त्याठिकाणी होते. मला आठवण त्यांची यासाठी राहिली की, हा सगळा भाग एका बाजूने राहू, एका बाजूने इथे उरळी कांचन आणि एका बाजूने शिरूरचा भाग या सगळ्यांमध्ये हा असलेला सगळा परिसर. या परिसरामध्ये संस्था चांगल्या देण्यासंबंधीचे विचार हा अनेक वर्षांपासून सुरू आहे. आनंदाची गोष्ट ही आहे की, नवी पिढी तयार करण्यासाठी २५ वर्षांपूर्वी या ठिकाणी माध्यमिक विद्यालय काढलं गेलं. त्या विद्यालयाला लोकनेते दादा जाधवराव यांचं नाव देण्यात आलं. दादा हे माझे अनेक वर्षांचे सहकारी आहेत. दादांसोबत काम केलेले अनेक सहकारी व्यासपीठावर या ठिकाणी आहेत. अनेक वर्ष समाजासाठी पुरंदर तालुक्याचे नेतृत्व करण्याची कामगिरी त्यांनी केली. लोकांशी सुसंवाद त्यांनी कायम ठेवला.

### हवेलीकरांच्या भेटीचा आनंद व्यक्त केला ...

» फार वर्षांनी इथे येता आलं व लोकांना भेटता आलं. त्याहीपेक्षा जे इथे उत्तम काम करण्याचा जो संकल्प केलेला आहे त्या संकल्पाला शुभेच्छा देणे व सहकार्य करण्याची संधी विकास लवांडे यांनी मला दिली. त्याचा आनंद पवार साहेबांनी व्यक्त केला.

# आळंदीत अग्निशमन सेवा सप्ताह: शाळेत अग्निसुरक्षा प्रात्यक्षिक, 1944 च्या वीरांना मानवंदना!

## शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना अग्निशमन यंत्रणेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

**पुणे | प्रतिनिधी**

मुंबईतील गोदीत १४ एप्रिल १९४४ रोजी लागलेल्या भीषण आगीत वीरमरण प्राप्त झालेल्या ६६ अग्निशमन जवान आणि अधिकाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी आळंदी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने आज, १८ एप्रिल २०२५ रोजी नगर परिषद शाळा क्रमांक १ येथे विशेष कार्यक्रम आयोजित केला. या निमित्ताने शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांना अग्निशमन यंत्रणेचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.तसेच आता राज्याचा अर्थमंत्री या नात्याने या चार स्पर्धांच्या आयोजनासाठी पुढील वर्षांपासून १ कोटी रुपयांचा निधी देणार असल्याचे जाहीर करतो. खेळ चांगला झाला पाहिजे, खेळाडूंना सर्व सुविधा मिळाल्या पाहिजेत, हा यामागे हेतू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला क्रिडामंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते. या कबड्डी स्पर्धेत राज्य सरकारच्या वतीने २० लाखांची बक्षीसे आहेत. तर यामध्ये बारामतीकरांच्या वतीने २५ लाखांची भर घालण्यात आली आहे, असे देखील पवार यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान आळंदी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील गोदीत झालेल्या भीषण आग दुर्घटनेत शहीद झालेल्या ६६ अग्निशमन जवान आणि अधिकाऱ्यांना मानवंदना देऊन श्रद्धांजली अर्पण केली. १९६८ मध्ये भारत सरकारने या वीरांच्या स्मरणार्थ १४ एप्रिल हा दिवस अग्निशमन सेवा दिन म्हणून घोषित केला होता. तेव्हापासून १४ ते २० एप्रिल हा कालावधी अग्निशमन सेवा सप्ताह म्हणून साजरा केला जातो.



### अग्निसुरक्षा जागृतीसाठी प्रात्यक्षिक

» आळंदी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने शाळेत आयोजित केलेल्या या कार्यक्रमात प्राथमिक अवस्थेतील आग विझवण्याच्या पद्धती, आगीचे प्रकार, फायर एक्स्टिंग्विशरचा वापर आणि स्वयंपाकघरातील एलपीजी गॅस सिलिंडरच्या गळतीमुळे लागणारी आग यावर कोणती खबरदारी घ्यावी, याची सविस्तर माहिती दिली. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी यासंबंधी प्रात्यक्षिक सादर केले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी या प्रात्यक्षिकात उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि अग्निसुरक्षेच्या पद्धती प्रत्यक्ष अनुभवल्या.

### अग्निशमन सप्ताहाचे महत्त्व

» अग्निशमन सेवा सप्ताहाचा उद्देश नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि अग्निशमन दलाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा आहे. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना आणि पालकांना आग लागण्याच्या प्रसंगी तातडीने काय काळजी घ्यावी, याचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळाले. आळंदी नगर परिषदेच्या या उपक्रमाने स्थानिक पातळीवर अग्निसुरक्षा जागृतीला चालना दिली आहे.